# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः01.10.2024** **वारःमंगळवार**

---

1. पश्चिम आशियातील घडामोडींसंदर्भात पंतप्रधान मोदी यांची इस्राईलचे पंतप्रधान बेंजामिन नेत्यान्याहू यांच्याशी चर्चा
2. जम्मू आणि काश्मीर विधानसभा निवडणुकांच्या तिसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यातील मतदानाला आज सकाळी सुरुवात
3. देशी गायीला राज्यमाता गोमाता दर्जा देण्याचा महाराष्ट्र सरकारचा निर्णय
4. सायबर गुन्हेगारीसंदर्भात सीबीआय चे देशभरात छापे, 26 जणांना अटक आणि
5. कानपूर कसोटी क्रिकेट सामन्यात भारताची पहिल्या डावानंतर 52 धावांची आघाडी

**<u>मोदी-इस्राइल</u>**

पश्चिम आशियातील अलीकडच्या काळातील घडामोडींविषयी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इस्राईलचे पंतप्रधान बेंजामिन नेत्यान्याहू यांच्याशी काल चर्चा केली. दहशतवादाला जगात कुठेही थारा नसल्याचं पंतप्रधानांनी आपल्या समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. पश्चिम आशियातील तणाव निवळणं आवश्यक आहे; ओलिस ठेवलेल्यांची सुरक्षित सुटका करणंही महत्त्वाचं असून, या क्षेत्रात लवकरात लवकर शांतता आणि स्थिरता प्रस्थापित व्हावी यासाठी भारताचा कायमच पाठिंबा असेल असंही पंतप्रधानांनी नमूद केलं.

**<u>नेत्यान्याहू इराण संवाद</u>**

इराणचं प्रशासन मध्य आशियाच्या संपूर्ण परिसराला युद्धाच्या आणि अंध:काराच्या खोल गर्तेत घेऊन चाललं आहे, असं सांगत इस्राइलचे पंतप्रधान बेंजामिन नेत्यान्याहू यांनी इराणच्या नागरिकांशी काल दृकश्राव्य संदेशाद्वारे संवाद साधला. मध्य आशियातील अशी कोणतीही जागा नाही जिथे इस्राइल पोहोचू शकत नाही; आम्ही कुठेही पोहोचून इस्राइलचं आणि इस्राइलच्या नागरिकांचं रक्षण करू शकतो असं त्यांनी या दृक श्राव्य फितीत म्हटलं आहे. इराण जेंव्हा धर्मांध शक्तींच्या दडपशाहीतून मुक्त होईल आणि इस्राइल आणि इराण मध्ये शांतता नांदेल तेंव्हा पर्यटन आणि तंत्रज्ञान विकासाचा दोन्ही देशांना फायदा होईल असंही नेत्यान्याहू यांनी म्हटलं आहे.

**<u>लेबनॉन</u>**

दरम्यान सलग दोन आठवडे मोठ्या प्रमाणावर हवाई हल्ले केल्यानंतर आणि हिजबोलाचा म्होरक्या हसन नासरल्ला याची हत्या झाल्यानंतर आता इस्राईलचं सैन्य लेबनॉनवर हल्ला करण्याच्या तयारीत असल्याचं आमच्या प्रतिनिधीनं म्हटलं आहे.

**<u>जमैका पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्ली इथं जमैकाचे पंतप्रधान डॉक्टर अँड्रु होलनेस यांच्याशी शिष्टमंडळ स्तरावर चर्चा करणार आहेत. दोन्ही देशातील संबंध अधिक दृढ करण्यासाठी आज दोन्ही देशांमध्ये अनेक सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या होण्याची शक्यता आहे. डॉक्टर होलनेस यांची ही पहिलीच भारत भेट आहे. या भेटीत ते राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपतींची देखील भेट घेणार आहेत. जमैकाचे पंतप्रधान इतर उच्चपदस्थ अधिकारी, व्यापारी आणि उद्योजकांशीही संवाद साधणार आहेत. तसंच, ते उद्या वाराणसीला भेट देणार आहेत.

## जम्मू काश्मीर निवडणुका

जम्मू आणि काश्मीर विधानसभा निवडणुकांच्या तिसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यातील मतदानाला आज सकाळी सुरुवात झाली आहे. ही मतदान प्रक्रिया शांततेत, सुरळीतपणे पार पडावी यासाठी राज्यातील सात जिल्ह्यातील 40 मतदार संघात अतिरिक्त सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. संध्याकाळी 6 पर्यंत मतदानाची वेळ आहे. सर्व मतदान केंद्र प्राथमिक सोयीसुविधांनी सुसज्ज असून 20 हजारांहून अधिक निवडणूक कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. या जिल्ह्यांमध्ये 5 हजार 60 मतदान केंद्र उभारण्यात आली आहेत. या टप्प्यात 39 लाखाहून अधिक मतदार 415 उमेदवारांचं भविष्य ठरवणार आहेत. जम्मू आणि काश्मीर विधानसभा निवडणुकीसाठी 18 आणि 25 सप्टेंबर पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात मतदान झालं. पहिल्या टप्प्यात 61% आणि दुसऱ्या टप्प्यात 57 % मतदानाची नोंद झाली. या सर्व टप्प्यांची मतमोजणी 8 ऑक्टोबरला होणार आहे.

## दादासाहेब फाळके पुरस्कार

ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाला आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल समाज माध्यमावरच्या संदेशाद्वारे ही माहिती दिली.

## हर घर दुर्गा

देशातल्या तरुणींमध्ये अन्याय आणि अत्याचाराचा प्रतिकार करण्याची क्षमता वाढवण्यासाठी, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी हर घर दुर्गा हे अभियान मोलाची भूमिका बजावेल; असा विश्वास लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी काल मुंबईत व्यक्त केला. कुर्ला इथल्या शासकीय औद्योगिक संस्थेमध्ये हर घर दुर्गा या अभियानाची सुरुवात बिर्ला यांच्या उपस्थितीत करण्यात आली; त्यावेळी ते बोलत होते. या अभियानाच्या माध्यमातून शासकीय औद्योगिक संस्थांमधल्या तरुणींना स्वरक्षणाचं मोफत प्रशिक्षण देणात येणार आहे. यावेळी अभिनेत्री अदा शर्मा यांनी युवतींना स्वसंरक्षणाचं महत्त्व सांगणारं प्रात्यक्षिक देखील सादर केलं.

## मंत्रीमंडळ निर्णय

ग्राम सेवक, कोतवाल आणि गृह रक्षक दलाच्या जवानांच्या मानधनात वाढ करण्याला काल महाराष्ट्र राज्य मंत्रीमंडळानं मान्यता दिली. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर मिळणाऱ्या ग्रॅच्युइटीच्या मर्यादेत वाढ करुन ते 20 लाखांपर्यंत करण्यात येणार आहे. राज्यातल्या गोशाळांना देशी गाईंच्या पालनासाठी प्रति दिन, प्रति गाय 50 रुपये अनुदान देण्याचा निर्णयही मंत्रीमंडळानं घेतला. अत्यल्प उत्पन्न असलेल्या गोशाळांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडून ऑनलाईन पद्धतीनं हा निधी देण्यात येईल. देशी गाई शेतकऱ्यांसाठी वरदान असून त्यांना राज्यमाता हा दर्जा देण्याचा निर्णय सरकारनं घेतल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना सांगितलं.

## आरोग्य मंत्रालय

मरणासन्न रुग्णांची जीवन आधार प्रणाली काढून घेण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचनाचा आराखडा आरोग्य मंत्रालयानं तयार केला आहे. या मसुदयावर नागरिकांची मते मागविण्यात येत आहेत. जे रुग्ण उपचारांनी बरे होण्याची कुठलीही शक्यता नाही आणि नजीकच्या भविष्यात ज्यांचा मृत्यू अटळ आहे असे रुग्ण तसंच ज्यांनी 72 तासात उपचारांना प्रतिसाद दिलेला नाही अशा मेंदूला गंभीर दुखापत झालेल्या रुग्णांचाही समावेश या यादीत केला आहे. डॉक्टरांनी या संदर्भात अनेक बाबींचा विचार करून निर्णय घ्यावा असं यामध्ये नमूद केलं आहे. मंत्रालयानं सांगितलं की, अतिदक्षता विभागात जीवन आधार प्रणालीच्या आधाराने असलेले अनेक मरणासन्न रुग्ण दाखल आहेत. ज्याचा रुग्णांना काहीच फायदा होत नाही उलट रुग्णांना त्रास आणि रुग्णांच्या नातेवाईकांना मोठा आर्थिक भार सहन करावा लागतो. या मसुदयात वैद्यकीय, तात्त्विक आणि कायदेशीर अशा सर्व बाबींचा विचार केला असल्याचं मंत्रालयानं नमूद केलं आहे.

**<u>सीबीआय</u>**

जगभरातल्या लोकांची सायबर गुन्हेगारीद्वारे फसवणूक करणाऱ्या टोळीत सामील असलेल्या 26 जणांना काल केंद्रिय अन्वेषण विभाग अर्थात सीबीआय नं अटक केली. देशभरातल्या विविध 32 ठिकाणी छापे घालून सीबीआय नं सायबर गुन्हेगारीचं हे जाळं उद्ध्वस्त केलं. या प्रकरणी पुण्यातून 10 जणांना अटक करण्यात आली असून पाच जणांना हैदराबादमधून तर 11 जणांना विशाखापट्टणम इथून ताब्यात घेतलं. या छाप्यात इलेक्ट्रॉनिक उपकरणं, मोबाइल फोन, लॅपटॉप, रोख रक्कम यासह अन्य साहित्य सीबीआय नं जप्त केलं. या गुन्हेगारांनी परदेशातल्या, प्रामुख्यानं अमेरिकेतल्या नागरिकांची तांत्रिक सहाय्य सेवा पुरवठादार बनून फसवणूक केली. सीबीआयचा आंतरराष्ट्रीय तपास विभाग इंटरपोल तसंच परदेशी तपास संस्थांच्या मदतीनं ऑपरेशन चक्र 3 अंतर्गत संघटित सायबर गुन्हेगारीविरोधात कारवाई करत आहे अशी माहिती सीबीआय नं दिली.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि बांग्लादेश दरम्यानच्या कानपूर क्रिकेट कसोटीमध्ये आजच्या अखेरच्या दिवशी बांग्लादेशचा संघ आपला दुसरा डाव 2 बाद 26 धावांच्या पुढे सुरू करेल. भारताच्या आर अश्विननं हे दोन्ही गडी बाद केले. तत्पूर्वी; दोन दिवसांनंतर काल खेळ पुन्हा सुरू झाल्यावर बांग्लादेशनं 107 धावांवरून आपला पहिला डाव सुरू केला आणि सर्वबाद 233 धावा केल्या. त्यानंतर भारतानं 9 गडी बाद 285 धावांवर आपला डाव घोषित केला. भारताला पहिल्या डावात 52 धावांची आघाडी मिळाली आहे.

**<u>आपत्ती निधी</u>**

केंद्र सरकारनं गुजरात, मणीपुर आणि त्रिपुरा या पुरबाधित राज्यांना राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीतून 675 कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या एकूण रकमेपैकी 600 कोटी रुपये गुजरातला, 50 कोटी रुपये मणिपूरला तर 25 कोटी रुपये त्रिपुरा राज्याला दिले आहेत. या राज्यांना यंदाच्या नैऋत्य मान्सून काळातील अतिवृष्टी, पूर आणि भुस्खलनामुळे मोठ्या प्रमाणावरील हानीला सामोरे जावे लागले. पुर बाधित राज्यांना सर्वतोपरी मदत करण्यास केंद्र शासन कटिबद्ध असल्याचं गृह मंत्रालयानं या संदर्भात दिलेलय निवेदनात म्हटलं आहे.

**<u>हवामान</u>**

अरुणाचल प्रदेश, तामिळनाडू, केरळ आणि पुद्दूचेरीमध्ये तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. इशान्येकडच्या राज्यातही काही ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.